N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** सातारा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0391 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**07/06/2026 00:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिंनाक पासून):** 06/06/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 06/06/2026

**Time From (वेळेपासून):** 17:48 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनाक ):** 06/06/2026 **Time (वेळ):** 23:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 06/06/2026 23:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रो-हाऊस क्र119,कासलिवाल मारवल,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सोपान सोनाजी चिट्टमपल्ले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप-अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग बीड,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप-अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग बीड,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9270221064

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय लक्ष्मण चव्हाण | | | 1. बीड बायपासरोड,,रो-हाऊस क्र119,,कासलिवाल मारवल सोसायटी वेस्ट,छत्रपती संभाजीनगर,सातारा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या 1280 नोटा. | 640,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
640,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिंनाक - 06/06/2026

मी, सोपान सोनाजी चिट्टमपल्ले,वय 43 वर्षे व्यवसाय-नौकरी,पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग बीड मो.नं 9270221064,9518973185 समक्ष सरकारतर्फे फिंयादी होऊन सातारा पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर शहर येथे हजर येवून फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग बीड येथे दि-31-05-2025 पासून पोलीस उप अधीक्षक म्हाणून कार्यरत आहे.

दि-26/05/2026 रोजी तक्रारदार श्री.सुशिल ऊर्फ सुयोग मधुकर सोळुंके, वय-36 वर्ष, व्यवसाय शेती व वाळु वाहतुक रा.गोंदी ता.अंबड जि.जालना यांनी आम्हास फोनवर संपर्क करुन त्यांची एका लोकसेवका विरुध्द तक्रार असल्याचे सांगुन आम्हास छत्रपती संभाजीनगर येथे येवुन त्यांची सविस्तर तक्रार घेवुन कायदेशीर कारवाई करण्याची विंनती केली.त्यावरुन आम्ही, शासकिय पंच व सापळा पथकासह शासकीय वाहन क्र. एम.एच 23 बी.एच 2668 ने झाल्टा फाटा जवळ छत्रपती संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. त्यानंतर तक्रारदार सुरक्षीत ठिकाणी हजर आले व त्यांनी त्यांची तक्रार आम्हास तोंडी सांगुन त्यांचे हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली की, दि. 12/05/2026 रोजी माझे पोकलेन साष्ट पिंपळगाव वाळु घाट क्र.01 समोरील बाजुस काम करत असताना तेथे पाहणी करण्यासाठी श्री.विजय चव्हाण तहसिलदार, अंबड जि.जालना हे आले व त्यावेळी त्यांनी माझी भेट घेतली व पोकलेन बाबत विचाले असता सदरचे पोकलेन माझे असल्याचे सांगीतले त्यावेळी तहसिलदार श्री.विजय चव्हाण साहेब यांनी मला पोकलेनवर कारवाई न करण्यासाठी माझे पोकलेन चालु देण्यासाठी 1,50,000/- प्रति दिवस प्रमाणे 08 दिवसाचे एकुण 1200000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच त्यांनी मला अंबड तालुक्यामध्ये तुझ्या वाळुची वाहतुक करत असल्याचे दिसुन येत आहे असे विचारुन त्यावेळी त्यांनी मला तुझ्याकडे किती टिप्पर आहेत असे विचारले असता मी त्यांना माझेकडे 06 हायवा टिप्पर असल्याचे सांगीतले त्यावर त्यांनी तुला वाळुची वाहतुक करायची असल्यास प्रत्येक हायावा टिप्परला 50,000/- रुपये असे एकुण 06 टिप्परचे 3,00,000/-दयावे लागतील असे सांगीतले. मी काही दिंवसानी श्री.विजय चव्हाण यांना त्यांनी पोकलेन चालु देवुन कारवाई न करण्यासाठी मागणी केलेल्या 12,00,000/- रुपयापैकी 8,00,000 रुपये मी त्यांना दिले असुन 4,00,000/- रुपये देणे बाकी आहे. तसेच 06 हायवा टिप्परचे 3,00,000/- रुपये दिलेले नाहीत. मला दिनाक 26/05/2026 रोजी श्री.विजय चव्हाण साहेब तहसिलदार अंबड यांनी भेटण्यासाठी निपाणी फाटा जवळ असलेले हॉटेल जनता दरबार येथे बोलावले आहे. तरी श्री.विजय चव्हाण हे मला भेटी दरम्यान बाकी राहिलेले उर्वरीत 4,00,000/- व 06 हायवाचे 50,000/- प्रमाणे 3,00,000/- रुपयाची असे एकुण 700000/- रुपयाची लाचेची मागणी करतील. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

तक्रारदार श्री.सुशिल सोळुंके यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.26/05/2026 रोजी आम्ही लोकसेवक श्री.विजय चव्हाण, तहसिलदार अंबड जि.जालना हे तक्रारदार यांचेकडे त्यांची भेट घेण्यासाठी निपाणी फाटा जवळ असलेल्या हॉटेल जनता दरबार जि.छत्रपती संभाजीनगर येथे पाठवुन लोकसेवक श्री.विजय चव्हाण हे बाळुघाटावर काम करत असलेले पोकलेनवर व वाळु वाहतुक करणाऱ्या 06 हायवा टिपर वर कारवाई न करण्यासाठी लाचेची मागणी करता किंवा कसे ? याबाबत तक्रारदार श्री.सुशिल सोळुंके व पंच क्रमांक -1 श्री.लक्ष्मण पांगरे यांना निपाणी फाटा जवळ असलेल्या हॉटेल जनता दरबार जि.छत्रपती संभाजीनगर येथे पाठवुन समक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार

असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देण्यात आली.त्यानंतर आमचे सुचनेवरून पोअं/ श्री. प्रदिप सुरवसे यांनी व्हाईस रकॉर्डर तक्रारदार यांचे बनियनचे डावे बाजुस छाती लगत सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.-1 पांगरे यांना लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांची भेट घेण्यासाठी निपाणी फाटा जवळ असलेल्या हॉटेल जनता दरबार जि.छत्रपती संभाजीनगर येथे 15.35 वा. तक्रारदार यांचे कडील स्कॉर्पीओ N क्रमांक MH-21-CC-0090 ने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 पांगरे हे तक्रारदार यांचेकडील स्कॉर्पीओने 16.10 वा. झाल्टा फाटा चौक जवळ, छत्रपती संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोअं./प्रदिप सुरवसे यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पांगरे यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पांगरे असे लोकसेवक श्री.विजय चव्हाण तहसिलदार यांचे भेट घेणे करीता हॉटेल जनता दरबार येथे गेले त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक यांची भेटझाली भेटी दरम्यान तक्रारदार व लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांचेत तक्रारदार यांचे कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार म्हणाले नाईटला सध्या आम्ही लई जपुन करतोत त्यावर लोकसेवक म्हणाले जपुनच करा बरंका त्यावेळी तक्रारदार म्हणाले पोकलॅन्डला अडचण येतीच ना साहेब त्यावर लोकसेवक चव्हाण हो असे म्हणाले आणि बघत बघत करा आता राहिलेत किती दिवस..मोजुन चौदा दिवस राहिले असे सांगीतले. त्यानंतर तकारदार व लोकसेवक यांचे मध्ये चर्चाझाली चर्चे दरम्यान तक्रारदार म्हणाले हे "आता लई व्हायला लागले 1,50,000 रुपये " त्यावर लोकसेवक म्हणाले "नाही नाही" त्यानंतर तक्रारदार यांनी काही कमी करा साहेब बाकीच्या टेंडरच्या ठिकाणी कमी जास्त आहेत.बाकीचे नाही उरकीत बसत हयाच्यात कमी करा हे "1,50,000/- रुपये रोज लई व्हाय लागला ना साहेब " त्यावर लोकसेवक पाणी घ्या असे म्हणाले व तक्रारदार यांचे कामा संदर्भाने बोलत होते. त्यावेळी तक्रारदार हे "मला वाटत काही तरी कमी करावा त्यात" असे म्हणाले असता लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी " एकही रुपया कमी करणार नाही.. बोलुच नको मला..असे सांगीतले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार लोकसेवक विजय चव्हाण यांना म्हणाले की, "ते आता तुम्हाला एकदा पाच अन एकदा तिन हे आठ दिवसाचेआठ पोहचले असे म्हणुन 8,00,000/- रुपये दिल्याचे सांगीतले आणि आता तुम्ही म्हणता अजुन चार दया, 4,00,000/- रुपये काही तरी कमी करा" त्यावर लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी " मी तुला एक रुपया ही कमी करणार नाही..चलं" असे सांगुन पोकलेन चालवण्यासाठी व पोकलेनवर कारवाई न करण्यासाठी उर्वरीत 4,00,000/- रुपयाची मागणी केली. तसेच त्यानंतर तक्रारदार श्री. सोळुंके म्हणाले की माझ्या गाडया चालुत माझ्याकड आता रॉयलटया फियलटया राहीन न राहीन त्याच काय दयायचं तुम्हाला सांगा " त्यावर लोकसेवक श्री.विजय चव्हाण म्हणाले "किती गाडया तुझ्या " त्यावेळी तक्रारदार यांनी सहा ..आठ होत्या दोनच्या ऍक्सीडेंट झाले" असे सांगीतले.तसेच सहा गाडयाचे तुम्हाला नंबर क्लिअर करुन देतो असे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक श्री.विजय चव्हाण "मला पाठवुन दे " असे म्हणाले असता तक्रारदार यांनी 'याच कस करायचे ते बी सांगा " त्यावर लोकसेवक यांनी " पन्नास-पन्नास देवुन टाक " असे म्हणुन प्रति गाडी 50000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार हे "पन्नास प्रति गाडी " असे म्हणाले असता लोकसेवक श्री.विजय चव्हाण "हं.." असे म्हणुन होकार दिला.त्यानंतर तक्रारदार "पन्नास हजार रुपये लई होतेत साहेब.., पंचवीस विस-पंचवीसनेच घेतात तुम्ही" असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी "मी जर तुला एक सांगीतले तर तु पन्नास म्हणला असता " असे म्हणाले.त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचेत वाळु वाहतुकीचे संदर्भाने चर्चा झाली. त्यानंतर परत एकदा तक्रारदार म्हणाले गाडयाचे सांगा किती रुपयांनी दयायचे.. त्यावर लोकसेवक श्री.विजय चव्हाण म्हणाले "सांगीतले ना " त्यावेळी तक्रारदार यांनी "साहेब तुम्ही पन्नास हजार रुपये कोणत्या हिशोबाने सांगु राहले मला तेच कळना..,त्याच्यात काहीना काही कमी करा.." त्यावर लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी "चाळीस,चाळीस, चाळीस देवुन टाक जाऊदी " असे सांगीतले त्यावेळी तक्रारदार " पर गाडी चाळीस हजार का " त्यावर लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी "हं" असे म्हणुन 40000/- रुपये प्रति गाडी प्रमाणे 06 गाडयाचे एकुण 2,40,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर तकारदार "लई व्हाय लागले.." असे म्हणाले असता लोकसेवक म्हणाले तान नको घेवु जास्त त्यावर तक्रारदार यांनी सांगीतले की मी रॉयलटी ठेवणार नाही बर का त्यावर लोकसेवक म्हणाले नको ठेवु. त्यानंतर तकारदार यांनी सांगीतले "हयाचे काय बघतो गाडयाचे नंतर देईन बरका साहेब " त्यावर लोकसेवक यांनी "देवुन टाक सगळे अन हे आता मागचे करुन टाक सगळे" असे म्हणुन वाळु घाटावर चालु असलेल्या पोकलेनवर कारवाई न करण्यासाठी उर्वरीत बाकी असलेले 4,00,000/- व 06 हायवाने वाळु वाहतुक करताना कारवाई न करण्यासाठी 2,40,000/- अशी एकुण 6,40,000/- रुपये लाचेची मागणी लाचरक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानतर तक्रारदार "करतो ना हे जमा जमी करुन घेतो ना" असे सांगीतले.त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.01 हे सुरक्षीत ठिकाणी हजर आले.आम्ही तक्रारदार यांना सापळा कावाईचे

आयोजन करणे बाबत सांगीतले असता तक्रारदार यांनी आम्हास सांगीतले की त्यांनी लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांना पैशाची जमवा जमवी करुन घेवुन आपणास संपर्क केल्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. तसा दिंनाक 26/05/2026 रोजी लाचमागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.
आज दि.06/06/2026 रोजी तक्रारदार श्री.सोळंके यांनी आम्हास फोनवर संपर्क करुन लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी मागणी केल्याप्रमाणे 6,40,000/- रुपये जमा झालेले असुन पुढील सापळा कारवाईचे आयोजन करणे कळविल्याने आम्ही, पंच व सापळा पथक सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या आवश्यक त्या सर्व साहिल्यासह लाप्रवि, बीड येथुन रवाना होवुन खाजगी वाहनाने एम आय टी कॉलेज जवळ, छ.संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार सुरक्षीत ठिकाणी हजर आले. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.विजय चव्हाण, तहसिलदार अंबड, जि.जालना यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असले बाबत सांगीतले. तक्रारदार यांना लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांची भेट कोठे होईल अशी विचारणा केली असता तक्रारदार श्री.सोळुंके यांनी सांगीतले की, लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी तक्रारदार यांना त्यांचे राहते घराचे जवळ येण्यास सांगीतले आहे. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना ते राहत असलेले घराचापत्ता विचारला असता तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.विजय चव्हाण हे रो-हाऊस क्र.119,कासलिवाल मारवल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. त्यावरुन आम्ही लागलीच पुढील सापळा कारवाईचे आयोजन रो-हाऊस क्र.119, कासलिवाल मारवल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर येथील राहते घरा जवळ करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही लागलीच सापळापुर्व कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगुन एमआयटी कॉलेज जवळ, छ. संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी खाजगी वाहनामध्ये पंचासमक्ष आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासीनपावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 1280 नोटा एकूण 6,40,000/- रुपयाचे नंबर व वर्णन कागदावर लिहुन घेवुन सदर नोटाच्या रक्कमेला अंथ्रासीन पावडर लावुन सदरील अंथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा असलेली रक्कम हिएका कापडी पिशवी मध्ये ठेवली सदरची पिशवी तक्रारदार यांचेकडे दिली. त्यानंतर तक्रारदार यांना लाचस्वीकृती नंतर करावयाचा ईशारा दर्शनी भागास येवुन "दोन्ही हाथ वर करणे " असा इशारा नेमुन दिला व वेळे अभावी लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करुन सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा सापळा कारवाई झाल्यानंतर एकत्रीत करण्यात येणार असल्याचे आम्ही पंच व तक्रारदारास सांगीतले.
सापळा पुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.विजय चव्हाण हे राहत असलेले घर रो-हाऊस क्र.119,कासलिवाल मारवल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर चे समोर जावुन लाचरक्कम 6,40,0000/- रुपये देण्यासाठी तक्रारदार श्री. सोळंके व पंच क्र 01 पांगरे हे तक्रादार यांचेकडील स्कार्पीओ N ने जाणार असल्याने माझे सुचनेवरून पोलीस अंमलदार श्री.सुरवसे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार यांचेकडे सुरक्षीत ठेवुन तक्रारदार श्री.सोळुंके व पंच क्र 01 पांगरे असे लोकसेवक श्री.विजय चव्हाण हे राहत असलेले घराजवळ रो-हाऊस क्र.119,कासलिवाल मारवल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर येथे 17.18 वा.पाठवुन त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 श्री.गित्ते व सापळा पथक खाजगी वाहनाने रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र. 1श्री.पांगरे असे लोकसेवक श्री.विजय चव्हाण हे राहत असलेले घर रो-हाऊस क्र.119,कासलिवाल मारवल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर चे जवळ बाहेरील रोडवर जावुन थांबले. आम्ही कासलिवाल मारवल सोसायटचे परीसरामध्ये सापळा लावुन तक्रारदार यांचे इशाऱ्याची वाट पाहत थांबलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी त्यांचे दोन्ही हाथ वर करुन 17.48 वा. त्यांना नेमुण दिलेला इशारा केला.
त्यांनतर माझे सुचनेवरून सापळा पथक तात्काळ सक्रिय होवून पंच क्र 02 श्री.गित्ते यांचेसह त्याठिकाणी हजर आले. माझे सुचनेवरून पोलीस अंमलदार सुरवसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केला. त्यांनतर मी पंच क्र. 01 श्री.पांगरे याना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.01 श्री.पांगरे यांनी तक्रारदार यांचे बाजुस रोडवर उभा असलेल्या व्यक्तीकडे आंगुली निर्देष करून हेच लोकसेवक श्री.विजय चव्हाण असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार श्री.सोळुंके यांचेकडुन उजव्या हाताने लाच रक्कम 640000/- रु. असेलेली लाचरक्कमेची कापडी पिशवी स्विकारून त्यांनी त्यांचे हातामध्ये धरुन ठेवली असे सांगितले. त्यावेळी श्री.विजय चव्हाण हे घाबरलेले होते. त्यांनतर आम्ही लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांना माझी, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यांनतर लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे विजय लक्ष्मण चव्हाण,वय-47 वर्ष, व्यवसाय नोकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबड जि.जालना रा.रो-हाऊस क्र.119, कासलिवाल मारवल सोसायटी वेस्ट, बीड बायपासरोड, छत्रपती संभाजीनगर मुळ रा.गन्ना तांडा,ता.कंधार, जि.नांदेड  वर्ग-1 असे सांगीतले. त्यांनतर मी लोकसेवक श्री.

विजय चव्हाण यांना स्विकारलेल्या लाचेची रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे हाता मधील लाचरक्कम असलेली कापडी पिशवी समोर धरली. त्यानंतर माझे सुचनेवरुन पंच क्र 02 श्री.गित्ते यांनी लाचरक्कम 6,40,000/- रुपये असलेली कापडी पिशवी ताब्यात घेवुन सदर नोटाचे क्रमांक व सापळा पुर्व पंचनाम्यातील नोटाचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली तसेच माझे सुचनेवरून आम्ही सर्वजन लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांचेसह खाजगी वाहनामध्ये बसवुन वाहनाचे दरवाजे व काचा बंद करुन कृत्रीम अंधार करुन लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांचे हात, लाचेची रक्कम अल्ट्राव्हायलेट लॅम्प सहाय्याने चेक केले असता लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांच्या उजव्या हातावर व लाचेच्या रक्कमेवर, व कापडी पिशवीच्या आतील बाजुस हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर घटनास्थळावरील प्राथमिक कारवाई करुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथक व लोकसेवक श्री. विजय चव्हाण असे खाजगी वाहनाने व तक्रारदार हे त्यांचेकडील स्कार्पीओ N ने सातारा पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर शहर येथे हजर आलोत.
त्यानंतर मी सापळा कारवाई दरम्यानचे व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले असता तक्रारदार व लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांची सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.विजय चव्हाण भेट झाली असता त्यांचेमध्ये तक्रारदार यांचे वाळु वाहतुकीचे संबंधाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी "" पहिले आठ दिवस चाललेले बारा होते बारा मधले चार अण आपल्या गाडयाचे सहा गाडयाचे चाळीस प्रमाणे दोन चाळीस असे 6,40,000/- रुपये आणलेत" असे म्हणाले असता लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांनी "किती आणलेत" असे विचारले असता तक्रारदार यांनी "6,40,000/- रुपये " असे सांगीतले त्यावेळी लोकसेवक श्री. विजय चव्हाण यांनी "हं" असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी आला हिशोब क्लिअर झाल्याचे सांगीतले. त्यावर लोकसेवक यांनी "हा आता मागचा क्लिअर झाला" असे म्हणाले व लाचरक्कम स्विकारली. तसा सविस्तर सापळा पुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा करण्यात आला.
तरी दिंनाक 26/05/2026 रोजी 15.35 वा.ते 16.10 वा. चे सुमारास निपाणी फाटा जवळ असलेल्या हॉटेल जनता दरबार जि.छत्रपती संभाजीनगर येथे यातील मुळ तक्रारदार श्री.सुशिल ऊर्फ सुयोग मधुकर सोळुंके यांचे तहसिलदार श्री.विजय चव्हाण साहेब यांनी मला पोकलेनवर कारवाई न करण्यासाठी माझे पोकलेन चालु देण्यासाठी 1,50,000/- प्रति दिवस प्रमाणे 08 दिवसाचे एकुण 1200000/- रुपयाची मागणी करुन त्यापैकी 800000/- रुपये यापुर्वी स्विकारले असुन तक्रारदार यांचे वाळु घाटावर चालु असलेल्या पोकलेनवर कारवाई न करण्यासाठी उर्वरीत बाकी असलेले 4,00,000/- व 06 हायवाने वाळु वाहतुक करताना कारवाई न करण्यासाठी प्रति हायवा 40000/- रुपये प्रमाणे 2,40,000/- अशी एकुण 6,40,000/- रुपये लाचेची मागणी लाचरक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन दि.06/06/2026 रोजी लोकसेवक श्री.विजय चव्हाण यांना त्यांचे राहत असलेले घराजवळ रो-हाऊस क्र.119,कासलिवाल मारवल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर चे जवळ लाचरक्कम 640000/- स्विकारताना 17.48 वा. पंचासमक्ष लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले. म्हणुन माझी श्री.विजय लक्ष्मण चव्हाण, वय-47 वर्ष, व्यवसाय-नोकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबड, जि.जालना रा.रो-हाऊस क्र.119, कासलिवाल मारवल सोसायटी वेस्ट, बीड बायपासरोड, छत्रपती संभाजीनगर मुळ रा. गन्ना तांडा,ता. कंधार, जि.नांदेड वर्ग-1 यांचेविरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिंयाद आहे.
हि फिंयाद दिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Krushnachandra kes

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN74603

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(ड्युटी ऑफिसर)
पोलीस ठाणे सातपूर
छत्रपती संभाजीनगर